**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/व्यका/न.क्र.३८८/
एकदृष्टा बैठीत विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, माझगाव रोड, भायखळा,
मुंबई ४०० ०२९,
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
**दिनांक:**


# प्रशासकीय परिपत्रक क्र. ६५० दि. १३/१२/२०२२

**विषय - शासन व्यवहारात देवनागरी लिपी व वर्णमालेनुसार मराठी हस्तलेखन, टंकलेखन, मुद्रण, संगणक इत्यादीसाठी स्वीकारलेली देवनागरी लिपी व वर्णमाला अद्ययावत करणेबाबत.**

**संदर्भ** - १) प्रशासकीय परिपत्रक क्र. २७३ दि.०२.०१.२०१०.
२) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र.कपासू-२०२०/प्र.क्र.५६/भाषा-२ दि.१०.११.२०२२.

दैनंदिन प्रशासकीय व्यवहारात प्रामुख्याने मराठी भाषेचा वापर करण्याचे महाराष्ट्र शासनाचे धोरण आहे. सदर धोरणान्वये याविषयी शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे पालन व अंमलबजावणी कंपनीमध्ये करण्यात आलेली आहे.

२. महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र. कपासू-२०२०/प्र.क्र.५६/भाषा-२ दि.१०.११.२०२२ अन्वये शासन व्यवहारात देवनागरी लिपी व वर्णमालेनुसार मराठी हस्तलेखन, टंकलेखन, मुद्रण, संगणक इत्यादींसाठी स्वीकारलेली देवनागरी लिपी व वर्णमाला अद्ययावत करण्याबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

३. महावितरण कंपनी अंतर्गत व कंपनी बाहेरील शासन व्यवहारात ज्या-ज्या ठिकाणी मराठी भाषेचा वापर होतो, अथवा भविष्यात केला जाणार आहे, अशा सर्व ठिकाणी शासनाच्या धर्तीवर खालीलप्रमाणे सक्षम अधिकारी यांनी मंजूरी प्रदान केलेली आहे.

क) मराठी भाषेच्या लेखनात एकरूपता राखण्याकरीता शासन निर्णय दि.१०.११.२०२२ मध्ये वर्णमालेच्या संदर्भातील स्पष्टीकरणे तसेच विशिष्ट अक्षरांच्या लेखनाबाबतच्या सूचना, स्वरचिन्हे, जोडाक्षरे, वर्णक्रम, लेखनात वापरावयाची विरामचिन्हे व अन्य चिन्हे, अंक, अंकांचे अक्षरी लेखन इत्यादीविषयी सविस्तर व सोदाहरण, सोबतच्या परिशिष्टांन्वये [परिशिष्ट - सात मराठी अक्षरमाला - तक्ता - (शालेय स्तरासाठी) वगळून] दिलेल्या सूचना कंपनीअंतर्गत आणि व्यवहारात अंगीकृत करण्यात याव्यात.

ख) शासन निर्णय दि.१०.११.२०२२ च्या धर्तीवर कंपनीचे प्रशासकीय परिपत्रक क्र.२७३ दि.०२.०१.२०१० अधिक्रमित करण्यात यावे व दि.१०.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये केलेले अनुषंगिक बदल अंगीकृत करावे.

४. सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना विनंती करण्यात येते की, सोबत जोडलेल्या दि.१०.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयांन्वये, शासन व्यवहारात मराठी भाषेच्या वापरासंदर्भात पारित केलेल्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

५. सदर परिपत्रक कंपनीच्या e-library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**सोबत :** शासन निर्णय दि.१०.११.२०२२.

**( भूषण कुलकर्णी )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

D:\O&M Cell DT 01.09.2022\Dy.Mgr (O&M)\Circular for Government Correction dt.12.12.2022.docx

**प्रत सविनय सादरः**

१) संचालक (संचलन)/ (वित्त)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.

३) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.

४) कार्यकारी संचालक (मासं)/ (सुवअं)/ (वित्त)/ (महसूल व देयके) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत सस्नेह रवानाः**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (सांघिक वित्त)/ (अंतर्गत लेखा परिक्षण) / (सांघिक लेखा) / (माहिती तंत्रज्ञान) / मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.

३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.

४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)

**प्रत रवानाः**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(नियोजन)/(मासं-मासंव्यप्र), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

शासन-व्यवहारात देवनागरी लिपी व वर्णमालेनुसार मराठी हस्तलेखन, टंकलेखन, मुद्रण, संगणक इत्यादींसाठी स्वीकारलेली देवनागरी लिपी व वर्णमाला अद्ययावत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
मराठी भाषा विभाग,
शासननिर्णय क्रमांक-कपासू-२०२०/ प्र०क्र०५६/ भाषा-२
नवीन प्रशासकीय इमारत, ८वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ .
दि० १०.११.२०२२

**वाचा :—** १. सामान्य प्रशासन विभाग, शासननिर्णय क्र० मभावा-२००४/ प्र०क्र०२५/२००४/ २० ब, दि० ०६ नोव्हेंबर, २००९.
२. मराठी भाषा विभाग, शासननिर्णय क्र० कपासू-२०२०/ प्र०क्र०५६/ भाषा-२, दि० २९ सप्टेंबर, २०२१.
३. मराठी भाषा विभाग, शासननिर्णय क्र० कपासू-२०२०/प्र०क्र०५६/ भाषा-२, दि० १५ नोव्हेंबर, २०२१.
४. मराठी भाषा विभाग, शासननिर्णय क्र० कपासू-२०२०/ प्र०क्र०५६/ भाषा-२, दि० ०५ एप्रिल, २०२२.

## प्रस्तावना

सर्व शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, मराठी पाठ्यपुस्तके इत्यादींमध्ये ज्या ज्या ठिकाणी मराठी भाषेचा वापर हस्तलेखन, टंकलेखन, मुद्रण इत्यादी स्वरूपांत केला जातो, त्या सर्व ठिकाणी देवनागरी लिपीतील प्रमाणीकृत मराठी वर्णमाला, अक्षरमाला व अंक कशा प्रकारे वापरण्यात यावेत ह्याबाबतचे निदेश सामान्य प्रशासन विभाग, शासननिर्णय दि० ०६.११.२००९ अन्वये देण्यात आले आहेत.

सदर शासननिर्णयामध्ये काही सुधारणा, बदल करणे आवश्यक असल्याचे मत काही शिक्षक, लेखक ह्यांनी शासनाकडे व्यक्त केले होते. तसेच, मराठी भाषेतील एकूण स्वर, स्वरादी ह्यांची संख्या, प्रमाणलेखनाबाबतचे नियम सोपे करणे इत्यादींबाबत निश्चित कार्यवाही करण्याची मागणी काही व्यक्तींनी केली होती. तसेच, मराठी भाषेतील तत्सम, तद्भव शब्दांबाबतचे नियम सोपे करण्याबाबत सन २०१९-२०च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विभागास कपात सूचना प्राप्त झाली होती. त्या अनुषंगाने

सामान्य प्रशासन विभाग, शासननिर्णय दि० ०६.११.२००९ मधील बाबींवर पुनर्विचार करण्यासाठी आणि देवनागरी लिपीच्या अभ्यासाला चालना देण्यासाठी 'मराठी भाषा प्रमाणलेखन निश्चितीकरण समिती' मराठी भाषा विभाग, शासननिर्णय दि० २९.०९.२०२१ अन्वये स्थापन करण्यात आली होती.

सर्व समिती-सदस्यांनी पुढील मुद्द्यांच्या अनुषंगाने साधकबाधक चर्चा करून समितीसाठी निश्चित केलेल्या कार्यकक्षेत घेतलेले निर्णय पुढीलप्रमाणे आहेत.

१. तत्सम व तद्भव शब्दांबाबतचे १८ नियम मराठी साहित्य महामंडळाने निश्चित केले असल्यामुळे ह्याबाबत मराठी साहित्य महामंडळानेच पुढील कार्यवाही करणे उचित होईल. त्यामुळे ही बाब समितीच्या कार्यकक्षेतून वगळण्यात आली आणि ह्याबाबतची पुढील कार्यवाही मराठी साहित्य महामंडळाने करावी असे ठरले.
२. 'ऌ' हे स्वरचिन्ह 'क्लृप्ती, क्लृप्त, ऌकार' अशा काही शब्दांच्या लेखनात वापरले जात असल्यामुळे हे स्वरचिन्ह वगळण्यात येऊ नये.
३. 'ञ्' ह्या व्यंजनचिन्हाचा वापर 'नञ् तत्पुरुष' ह्या शब्दात तसेच मराठी भाषेतील प्रमाणलेखनाच्या नियमानुसार तत्सम शब्दांत अनुस्वाराच्या जागी पर-सवर्ण वापरून लिखाण करतानाही केला जातो. त्यामुळे 'ञ्' हे व्यंजनदेखील वर्णमालेतून वगळण्यात येऊ नये.
४. सामान्य प्रशासन विभाग, शासननिर्णय दि० ०६.११.२००९ च्या सहपत्रान्वये निश्चित करण्यात आलेल्या मराठी वर्णमालेतील सर्व स्वर, स्वरादी, व्यंजने, विशेष संयुक्त व्यंजने ह्यांच्या संख्येत समितीने कोणताही बदल प्रस्तावित केलेला नाही.
५. सामान्य प्रशासन विभाग, शासननिर्णय दि० ०६.११.२००९ च्या सहपत्रामध्ये 'स्वरेतर चिन्हाचे नाव' ह्या शीर्षकाचा नवीन रकाना बनवून त्यात शिरोबिंदू, विसर्ग, हलन्त, अधोबिंदू (नुक्ता), अवग्रह ही चिन्हे दर्शवण्यात यावीत. तसेच, ह्या बदलाच्या अनुषंगाने उक्त शासननिर्णयातील परिशिष्ट एकमधील मुद्दा क्र० ०४ मध्ये अनुरूप बदल करण्यात यावेत. शासननिर्णयातील 'स्वरचिन्हाचे नाव' ह्या रकान्याशेजारी असलेल्या 'चिन्ह' ह्या रकान्याचे नाव बदलून 'स्वरांशचिन्हे' असे करण्यात यावे.
६. स्वरेतर चिन्हांच्या तक्त्यामध्ये 'चंद्रबिंदू' ह्या नवीन चिन्हाचा समावेश करण्यात यावा व त्यासंदर्भात टीप देण्यात यावी.
७. शासननिर्णय दि० ०६.११.२००९ च्या परिशिष्ट तीनमधील 'विरामचिन्हे व इतर चिन्हे' ह्याअंतर्गत सध्या असलेल्या चिन्हांबरोबरच व्याप्तिचिन्ह, छेदचिन्ह, तिर्यकरेषा ह्यांचा समावेश करण्यात यावा.
८. विसर्ग व अपूर्णविराम ह्यांतील, तसेच 'ऱ्या'मधील रकार व संयोगचिन्ह ह्यांतील फरक स्पष्ट करण्यासाठी त्यासंदर्भात टीप देण्यात यावी. 'अधोरेखा' हे चिन्ह उदाहरणासह दर्शवण्यात यावे.
९. 'अब्ज' ह्या संख्येनंतरच्या 'खर्व, निखर्व' इत्यादी संख्यांसाठीच्या वाचक शब्दांचा समावेश करणे शक्य आहे का ह्याबाबत विचार करण्यात यावा. (नंतर अभ्यासान्ती, अधिकृत प्रमाण संदर्भस्रोताच्या अभावी 'अब्ज' ह्या संख्येनंतरच्या संख्यावाचक शब्दांचा समावेश करता येणार नाही असा निर्णय घेण्यात आला.)

१०. शासननिर्णय दि० ०६.११.२००९ मधील 'मराठी अक्षरमाला तक्ता – शालेय स्तरासाठी' ह्यातील 'स्वर व स्वरचिन्हे' ह्या विभाग शीर्षकाऐवजी 'स्वरचिन्हे व स्वरांशचिन्हे' असे विभागशीर्षक द्यावे.

११. 'श' व 'ल' ह्या अक्षरांची दृश्यरूपे ह्या मुद्द्याबाबत समिती-सदस्यांच्या भूमिका थोड्या वेगवेगळ्या होत्या. काही सदस्यांनी देठयुक्त 'श' व गाठयुक्त 'श' तसेच पाकळीयुक्त 'ल' व दंडयुक्त 'ल' अशा दोन्ही दृश्यरूपांना प्रमाण म्हणून मान्यता देण्यात यावी, असे मत मांडले होते. परंतु साधकबाधक चर्चेनंतर अंतिमतः सर्वानुमते सन २००९ च्या शासननिर्णयात नमूद केल्यानुसार, देठयुक्त 'श' व पाकळीयुक्त 'ल' हीच दृश्यरूपे प्रमाणरूपे म्हणून स्वीकारण्यात यावी व त्या अनुषंगाने त्या संदर्भातील शासननिर्णय दि० ०६.११.२००९ मधील मांडणीत कोणतेही बदल करण्यात येऊ नयेत, असा निर्णय घेण्यात आला.

१२. शासननिर्णय दि० ०६.११.२००९ च्या परिशिष्ट दोनमध्ये जोडाक्षरलेखनासंबंधी केलेली मांडणी काहीही बदल न करता प्रमाण म्हणून स्वीकारण्यात यावी.

थोडक्यात, सामान्य प्रशासन विभाग, शासननिर्णय दि० ०६.११.२००९ चा अभ्यास केल्यानंतर समिती-सदस्यांनी मत नोंदवले की सदर शासननिर्णय अनेक जाणकार तज्ज्ञ-अभ्यासकांच्या सूचनांनुसार तयार केला गेला होता आणि ह्या शासननिर्णयाची व्याप्ती आणि भूमिका योग्य आहे. त्यामुळे शासननिर्णयासोबतचे सहपत्र व परिशिष्टे ह्यांमध्ये स्वर व स्वरादी ह्यांची संख्या नमूद करणे, 'स्वरचिन्हे, स्वरांशचिन्हे, स्वरेतर चिन्हे' अशा संज्ञा-संकल्पनांबाबत अधिक काटेकोरपणा आणणे, 'चंद्रबिंदू' ह्या चिन्हाचा समावेश करणे, 'व्याप्तिचिन्ह, छेदचिन्ह, तिर्यकरेषा' ह्या लेखनचिन्हांचा समावेश करणे, 'अधोरेखा' ह्या चिन्हाचे उदाहरण देणे अशा आनुषंगिक बाबींचा समावेश करण्याची बाब वगळता, सदर शासननिर्णयात मूलभूत पातळीवर फारसा फरक करण्याची आवश्यकता नाही, असा निर्णय समितीद्वारे घेण्यात आला. त्यामध्ये केवळ उपरोल्लेखित निर्णयांशी संबंधित बाबींचा समावेश करून सर्व समितीच्या वतीने समिती-सदस्य डॉ० गिरीश दळवी, डॉ० अनघा मांडवकर आणि डॉ० रेणुका ओझरकर ह्यांनी शासननिर्णय ०६.११.२००९ मध्ये सुधारणा करून शासनास सादर केल्या आहेत.

ह्या पार्श्वभूमीवर, दि० ०६.११.२००९ चा शासननिर्णय अधिक्रमित करून सदर शासननिर्णयातील मूलभूत बाबींमध्ये बदल न करता, त्यामध्ये केवळ उपरोक्त नमूद आनुषंगिक बाबींचा समावेश करून अद्ययावत शासननिर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

## शासननिर्णय

सर्व शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, मराठी पाठ्यपुस्तके इत्यादींमध्ये तसेच ज्या ज्या ठिकाणी मराठी भाषेचा वापर होतो अथवा भविष्यात केला जाणार आहे अशा सर्व ठिकाणी हस्तलेखन, टंकलेखन, मुद्रण, संगणक इत्यादींसाठी सोबत जोडलेल्या तक्त्यात दर्शवण्यात आलेल्या देवनागरी लिपीतील प्रमाणीकृत मराठी वर्णमालेचा, अक्षरमालेचा व अंकांचा शासनाने स्वीकार केला आहे. त्या अनुषंगाने वर्णमालेच्या संदर्भातील

स्पष्टीकरणे तसेच विशिष्ट अक्षरांच्या लेखनाबाबतच्या सूचना, स्वरचिन्हे, जोडाक्षरे, वर्णक्रम, लेखनात वापरावयाची विरामचिन्हे व अन्य चिन्हे, अंक, अंकांचे अक्षरी लेखन इत्यादींविषयी सविस्तर व सोदाहरण सूचना देणारी सात परिशिष्टे सोबत जोडली आहेत. मराठी भाषेच्या लेखनात एकरूपता राखण्यासाठी सर्वांनी ह्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

ह्या संदर्भातील ह्यापूर्वी काढण्यात आलेले सर्व शासननिर्णय अधिक्रमित करण्यात येत आहेत.

हा शासननिर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक-संकेतांक २०२२१११०१५३००२९२३३ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल ह्यांच्या आदेशानुसार व नावाने,

MILIND BHAGWAN GAWADE

Digitally signed by MILIND BHAGWAN GAWADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MARATHI LANGUAGE DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d043e1f55c6ded344ffebea8801d8c286bfdcafaea54c716c9b31b47b87a9476, pseudonym=3FD721BE2B19DF245E0157FD3DC7B26475009465, serialNumber=EF777B84EAC7F675E3493144EF06F0FA1CB47DE2A32BE1156CA04D038F42D6E1, cn=MILIND BHAGWAN GAWADE
Date: 2022.11.10 18:38:42 +05'30'

(मिलिंद गवादे)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा॰ राज्यपाल ह्यांचे सचिव
२. मा॰ मुख्यमंत्री ह्यांचे सचिव
३. मा॰ मंत्री व राज्यमंत्री ह्यांचे खाजगी सचिव
४. मा॰ मंत्री, मराठी भाषा ह्यांचे स्वीय सहायक
५. मा॰ विरोधी पक्षनेते, विधानसभा/विधानपरिषद ह्यांचे खाजगी सचिव
६. सर्व सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ (विधानपरिषद/विधानसभा), मुंबई
७. समिती प्रमुख, मराठी भाषा समिती, महाराष्ट्र विधानमंडळ, विधानभवन, मुंबई
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
१०. सर्व विभागीय आयुक्त
११. सर्व जिल्हाधिकारी
१२. सर्व मंत्रालयीन विभाग – त्यांनी त्यांच्या आधिपत्याखालील विभागप्रमुख, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे आणि कार्यालयप्रमुख ह्यांच्या निदर्शनास सदर शासननिर्णय आणावा.
१३. प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने)
१४. प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने)
१५. प्रबंधक, लोकायुक्त/उप-लोकायुक्त, मुंबई (पत्राने)
१६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)

१७. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा/विधानपरिषद), मुंबई (पत्राने)
१८. सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१९. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई
२०. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
२१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२३. अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ
२४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
२५. भाषा संचालक, भाषा संचालनालय, मुंबई
२६. संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
२७. सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई
२८. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
२९. निवड नस्ती/कार्यासन-भाषा-२

मराठी भाषा विभाग, शासननिर्णय क्र० कपासू-२०२०/प्र०क्र०५६/भाषा-२,
दि० १० नोव्हेंबर, २०२२ सोबतचे सहपत्र.

# महाराष्ट्र शासनाने स्वीकारलेली
# मराठी वर्णमाला

**एकूण वर्ण – ५२**

## स्वर (१४)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ | आ | इ | ई | उ |
| ऊ | ऋ | ऌ | ए | ॲ |
| ऐ | ओ | ऑ | औ | |

## स्वरादी (०२)

ं (अनुस्वार) ः (विसर्ग)

## व्यंजने (३४)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क् | ख् | ग् | घ् | ङ् |
| च् | छ् | ज् | झ् | ञ् |
| ट् | ठ् | ड् | ढ् | ण् |
| त् | थ् | द् | ध् | न् |
| प् | फ् | ब् | भ् | म् |
| य् | र् | ल् | व् | |
| श् | ष् | स् | | |
| ह् | ळ् | | | |

## विशेष संयुक्त व्यंजने (०२)

क्ष् ज्ञ्

## अंक

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ० | १ | २ | ३ | ४ |
| ५ | ६ | ७ | ८ | ९ |

# स्वरचिन्हे आणि स्वरेतर चिन्हे

**मराठी लेखन-मुद्रणासाठी व संगणकीय क्षेत्रासाठी पुढील चिन्हांचा वापर करावा.**

## स्वरचिन्हे व स्वरांशचिन्हे

| स्वरांशचिन्हाचे नाव | स्वरांशचिन्ह | चिन्ह ज्या स्वरासाठी/प्रयोजनासाठी वापरावयाचे तो स्वर/ते प्रयोजन | व्यंजनाचे होणारे रूप |
|---|---|---|---|
| १. **काना** | ा | आ | क् + आ = का |
| २. **इकार** | | | |
| ऱ्हस्व इकार | | | |
| काना व वेलांटी | ि | इ | क् + इ = कि |
| दीर्घ इकार | | | |
| वेलांटी व काना | ी | ई | क् + ई = की |
| ३. **उकार** | | | |
| ऱ्हस्व उकार | ु | उ | क् + उ = कु |
| दीर्घ उकार | ू | ऊ | क् + ऊ = कू |
| ४. **ऋकार** | ृ | ऋ | क् + ऋ = कृ |
| ५. **ऌकार** | ॢ | ऌ | क् + ऌ = कॢ |
| ६. **मात्रा** | | | |
| (अ) एक मात्रा | े | ए (मात्र ‘ए’ ह्या स्वरचिन्हावर मात्रा येणार नाही.) | क् + ए = के |
| (आ) दोन मात्रा | ै | ऐ (मात्र ‘ऐ’ ह्या स्वरचिन्हावर एक मात्रा येते.) | क् + ऐ = कै |
| (इ) काना + एक मात्रा | ो | ओ | क् + ओ = को |
| (ई) काना + दोन मात्रा | ौ | औ | क् + औ = कौ |
| ७. **अर्धचंद्र** | | | |
| (अ) फक्त अर्धचंद्र | ॅ | अॅ | क् + अॅ = कॅ |
| (आ) अर्धचंद्र + काना | ॉ | ऑ | क् + ऑ = कॉ |

## स्वरेतर चिन्हे

| स्वरेतर चिन्हाचे नाव | स्वरेतर चिन्ह | चिन्ह ज्या स्वरासाठी/प्रयोजनासाठी वापरावयाचे तो स्वर/ते प्रयोजन | व्यंजनाचे होणारे रूप |
|---|---|---|---|
| **१. स्वरादी चिन्हे** | | | |
| (अ) शिरोबिंदू | ं | अक्षरात मिसळलेले अनुनासिक वा अनुस्वार दर्शवण्यासाठी | क् + अ + ं = कं |
| (आ) विसर्ग | ः | विसर्गाचा उच्चार दर्शवण्यासाठी | क् + अ + ः = कः |
| **२. अतिरिक्त चिन्हे** | | | |
| (अ) चंद्रबिंदू | ँ | स्वरांचा सानुनासिक उच्चार दर्शवण्यासाठी | क् + अँ = कँ |
| (आ) हलन्त | ् | स्वररहित व्यंजनवर्ण दर्शवण्यासाठी | क् = क् |
| (इ) अधोबिंदू (नुक्ता) | ़ | विशिष्ट उच्चारभेद दर्शवण्यासाठी | क् + . + अ = क़ |
| (ई) अवग्रह | ऽ | संधिप्रक्रियेच्या लेखनामध्ये मुळात असलेला 'अ' दर्शवण्यासाठी/स्वराचा लांबलेला उच्चार दर्शवण्यासाठी | कः + अहम् = कोऽहम्<br>क् + अऽ = कऽ |

### टिपा

**१. स्वरचिन्हे आणि स्वरांशचिन्हे**

देवनागरी लेखनात 'स्वरचिन्हे' आणि 'स्वरांशचिन्हे' अशी दोन प्रकारची चिन्हे आहेत. उदाहरणार्थ, 'आ' हे स्वरचिन्ह आहे आणि 'ा' (काना) हे 'आ' ह्या स्वराचे स्वरांशचिन्ह आहे. दोन्हींचे वाचन 'आ' असेच होते; पण 'आ' हे स्वरचिन्ह सुटे लिहिता येते तर 'ा' (काना) हे स्वरांशचिन्ह व्यंजनाला जोडूनच लिहावे लागते.

**२. स्वरेतर चिन्हांच्या गटाविषयी स्पष्टीकरण**

ह्या गटातील चिन्हे ही स्वरचिन्हे नसून स्वरधर्मदर्शन, स्वरलोपदर्शन इत्यादी काही वेगळ्या कार्यांसाठी योजिली जातात. त्यामुळे त्यांचा समावेश 'स्वरेतर चिन्हे' ह्या वेगळ्या गटात केला आहे.

'बिंदू' आणि 'विसर्ग' ह्यांना 'स्वरादी' म्हटले आहे. ही एका प्रकारची 'स्वरधर्मदर्शक चिन्हे' आहेत. ती स्वरचिन्हानंतर अथवा व्यंजनचिन्हाला जोडलेल्या स्वरांशचिन्हानंतर लिहिण्यात येतात.

'शिरोबिंदू' ह्या चिन्हाचा मराठी लेखनात पुढील चार प्रकारे वापर होताना दिसतो.

(अ) वर्गीय अनुनासिक व्यंजनाच्या ऐवजी त्याच्या आधी येणाऱ्या लगतच्या अक्षरावर दिला जाणारा शिरोबिंदू. उदाहरणार्थ, अन्त/अंत.

(आ) वर्गीय व्यंजनाव्यतिरिक्तच्या (उदाहरणार्थ, श्, ष्, स्, ह्) आधीच्या अक्षरासोबतचा नासिक्य उच्चार दर्शवण्यासाठी दिला जाणारा शिरोबिंदू.
उदाहरणार्थ, अंश, सिंह इत्यादी.

(इ) स्वराचा अनुनासिक उच्चार दर्शवण्यासाठी दिला जाणारा शिरोबिंदू.
उदाहरणार्थ, 'अं! असं कसं म्हणतेस तू?' ह्या वाक्यातील 'अं'.

(ई) अ-काराचा लांबट किंवा दीर्घ उच्चार दर्शवण्यासाठी दिला जाणारा शिरोबिंदू.
उदाहरणार्थ, गावं, झाडं, झालं, केलं, घोडं इत्यादी.

अतिरिक्त चिन्हांतील 'चंद्रबिंदू' हे चिन्हही स्वरधर्मदर्शकच आहे. ते स्वराचा सानुनासिक भेद दर्शवते. उदाहरणार्थ, ह् + अ + ँ = हँ. इथे 'अ' हा स्वर सानुनासिक उच्चारला जातो. शिरोबिंदू व चंद्रबिंदू ह्यांच्या वापरात काही अंशी भिन्नता आहे. उदाहरणार्थ, चंद्रबिंदू हा शिरोबिंदूप्रमाणे पर-सवर्ण दर्शवण्यासाठी वापरला जात नाही. त्यामुळे चंद्रबिंदू ह्या चिन्हाचा अतिरिक्त चिन्हांच्या गटात समावेश केला आहे.

'हलन्त' हे स्वरलोपदर्शक चिन्ह आहे. ते व्यंजनाक्षरात स्वरोच्चाराचा अभाव दर्शवते.

'अवग्रहा'चे योजन संधिप्रक्रियेच्या लेखनात मूळ उच्चारातील अ-काराचे अस्तित्व दर्शवण्यासाठी होत असते. उदाहरणार्थ, शिवोऽहम् – शिवः अहम्. तसेच त्याचे योजन स्वरोच्चाराचा लांबलेला उच्चारकालावधी दर्शवण्यासाठीही होत असते. उदाहरणार्थ, या रे याऽऽ सारे याऽऽ. त्यामुळे अवग्रहाला अतिरिक्त चिन्हांत समाविष्ट केले आहे. स्वरधर्मदर्शक चिन्हांहून त्याचे वेगळेपण म्हणजे ते सुटे लिहिता येते.

'अधोबिंदू (नुक्ता)' ह्या चिन्हाचा स्वराशी संबंध येत नसून; मराठीत ते 'च्, छ्, ज्, झ्' ह्या व्यंजनांखाली दाखवले असता, त्यांचा उच्चार तालव्य न करता दंतमूलीय किंवा दंत्य व्हावा असा मराठीच्या वापरातील संकेत आहे. 'अधोबिंदू (नुक्ता)' ह्या चिन्हाच्या वापरासंबंधी परिशिष्ट एकमधील लेखनविषयक विशेष सूचनांमधील सूचना क्र० २ पाहावी.

**३.** 'र्' ह्या व्यंजनाला उ-कार लावण्याच्या संदर्भात परिशिष्ट एकमधील लेखनविषयक विशेष सूचनांमधील सूचना क्र० ४ पाहावी.

# परिशिष्ट एक

**१. ‘ॲ’ आणि ‘ऑ’ ह्यांचा वर्णमालेमध्ये समावेश**

‘ॲ’ आणि ‘ऑ’ हे मराठीत असलेले परंतु इंग्रजी शब्दांमध्ये वैपुल्याने वापरले जाणारे असे दोन स्वरोच्चार आहेत. त्यांचा स्वरांमध्ये समावेश करण्याची आवश्यकता असल्यामुळे वर्णमालेमध्ये, स्वरांमध्ये उच्चारस्थानानुसार ‘ए’नंतर ‘ॲ’ आणि ‘ओ’नंतर ‘ऑ’ ह्यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

**२. स्वरादी**

ं (अं) आणि ः (अः) ही अनुक्रमे शिरोबिंदू (अनुस्वार/अनुनासिक) व विसर्ग ह्यांची चिन्हे आहेत. त्यांचा उच्चार करताना कोणत्यातरी एका स्वराचा उच्चार प्रथम करावा लागतो, म्हणून त्यांना ‘स्वरादी’ असे म्हणतात. शिरोबिंदू व विसर्ग हे स्वर नसल्यामुळे वर्णमालेमध्ये त्यांचा ‘स्वरादी’ म्हणून स्वतंत्र निर्देश करण्यात आलेला आहे.

**३. ऋ, ॠ आणि ऌ, ॡ**

‘ऋ’ व ‘ऌ’ ह्या ऱ्हस्व स्वरांचा वर्णमालेमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. ‘ॠ’ व ‘ॡ’ ह्या दीर्घ स्वरांचा वर्णमालेमध्ये समावेश करण्यात आलेला नाही. तथापि, संस्कृत भाषेतील अवतरणे देण्यासाठी, संधी करण्यासाठी तसेच संगणकांच्या ओ॰ सी॰ आर॰ (Optical Character Recognition) तंत्रज्ञानाच्या दृष्टिकोनातून आवश्यक असल्यामुळे ‘ॠ’ व ‘ॡ’ हे दीर्घ स्वर तसेच देवनागरीतील सर्व नवी-जुनी व्यंजनाक्षरे, जोडाक्षरे, त्यांची विविध रूपे, चिन्हे इत्यादी संगणकाच्या स्मृतिकोशामध्ये ठेवण्यात येणार आहेत.

**४.** वर्णमालेमध्ये आता एकूण १४ स्वर आहेत. हे १४ स्वर आणि ०२ स्वरादी यांच्या संयोगाने आता प्रत्येक व्यंजनाची १६ अक्षरे तयार होतील. व्यंजन-वर्णाचे अक्षर तयार करण्यासाठी १४ स्वरांची जी चिन्हे व्यंजनांना जोडली जातात त्यांना ‘स्वरांशचिन्हे’ असे शीर्षक देण्यात आले आहे. स्वरादींची चिन्हे आणि चंद्रबिंदू, हलन्त, अधोबिंदू (नुक्ता) व अवग्रह ही अतिरिक्त चिन्हे स्वरचिन्हे नसून; ती स्वरधर्मदर्शन, स्वरलोपदर्शन इत्यादी काही वेगळ्या कार्यांसाठी योजिली जातात. त्यामुळे त्यांचा समावेश ‘स्वरेतर चिन्हे’ ह्या वेगळ्या गटात केला आहे.

**५.** ‘क्ष’ आणि ‘ज्ञ’ हे देवनागरी वर्णमालेतील परंपरेने चालत आलेले विशेष लेखन-चिन्हाकार आहेत. वास्तवात ती जोडाक्षरेच आहेत. म्हणून ह्या दोन जोडाक्षरांचा वर्णमालेमध्ये ‘विशेष संयुक्त व्यंजने’ म्हणून निर्देश करण्यात आला आहे.

**६.** वर्णमालेमध्ये अंक देताना देवनागरीत देण्यात आलेले आहेत.

## ७. लेखनविषयक विशेष सूचना

(अ) ‘ख’चे लेखन करताना ‘रव’ असे न करता ‘ख’ असे खालच्या बाजूने जोडून करावे. ‘श’चे लेखन करताना ‘श’ असे देठयुक्त करावे. ‘श’ असे गाठयुक्त करू नये. ‘ल’चे लेखन करताना ‘ल’ असे करावे. ‘ल’ असे दंडयुक्त करू नये.

(आ) ‘च’ व ‘झ’ ह्या व्यंजनांचे दंतमूलीय/दंत्य आणि तालव्य हे उच्चारभेद दर्शवण्यासाठी अधोबिंदू (नुक्ता) देण्याची गरज नाही. तथापि, हिंदी भाषेतील अवतरणात किंवा उर्दू वा सिंधी भाषेतील देवनागरीत अवतरणे देताना अधोबिंदू (नुक्ता) वापरावा लागेल. त्यामुळे स्वरेतर चिन्हांच्या तक्त्यामध्ये अतिरिक्त चिन्ह म्हणून अधोबिंदू (नुक्ता) दर्शवण्यात आलेला आहे. शब्दकोशामध्ये व इतरत्र स्वतंत्रपणे जर उच्चारभेद कंसात दाखवावयाचे असतील तर अधोबिंदूचा वापर करावा.

(इ) जोडाक्षरलेखन पारंपरिक पद्धतीने करावे. परिशिष्ट दोनमध्ये जोडाक्षरलेखनाच्या पद्धती दर्शवल्या आहेत.

(ई) ऱ्हस्व ‘रु’ आणि दीर्घ ‘रू’ चे लेखन ऱ्हस्व-दीर्घ उ-कारचिन्हे खाली न जोडता, म्हणजे अनुक्रमे ‘रु’ व ‘रू’ असे न करता ‘रु’ व ‘रू’ असेच करावे.

(उ) अक्षरांवर शिरोरेखा देणे आवश्यक आहे.

# वर्णचिन्हांचा तक्ता

## १. वर्णमाला व अक्षरमाला

देवनागरी लिपीतील मराठीतील लेखनचिन्हांच्या तक्त्याला 'वर्णमाला' व 'अक्षरमाला' असे कारणानुसार म्हणावे. स्वर व व्यंजने हे दोन्ही वर्ण आहेत. स्वर स्वयंपूर्ण असतात. त्यामुळे स्वराचा वर्ण व स्वराचे अक्षर ह्यांत फरक असत नाही. व्यंजन हे स्वरावलंबी असते. व्यंजनामध्ये स्वर मिसळल्यानंतर व्यंजनाचे अक्षर तयार होते. त्यामुळे व्यंजन-वर्ण पाय मोडून दाखवला जातो. (उदाहरणार्थ, 'क्') आणि व्यंजन-अक्षर स्वरयुक्त (उदाहरणार्थ, 'क') दाखवले जाते. म्हणून ज्या तक्त्यामध्ये व्यंजने पाय मोडून वर्णस्वरूपात दर्शवलेली असतील त्या तक्त्याला 'वर्णमाला' म्हणावे आणि ज्या तक्त्यात व्यंजने 'अ' ह्या स्वराने युक्त म्हणजे अक्षरस्वरूपात दर्शवलेली असतील त्या तक्त्याला 'अक्षरमाला' म्हणावे.

शालेय प्राथमिक स्तरावर प्रथम अक्षरमालेचा तक्ता शिकवावा. प्राथमिक स्तरानंतर पुढील इयत्तेमध्ये विद्यार्थ्यांना वर्णमालेचा तक्ता शिकवावा. त्यासाठी परिशिष्ट सहामध्ये व सातमध्ये दर्शवल्याप्रमाणे दोन स्वतंत्र तक्ते तयार करावेत.

२. वर्णचिन्हांच्या तक्त्यात वर्णक्रम पुढीलप्रमाणे ठेवावा.

**स्वर**

अ आ इ ई उ ऊ ऋ ऌ ए ॲ ऐ ओ ऑ औ

**स्वरादी**

ं (अं) ः (अः)

**व्यंजने**

क् ख् ग् घ् ङ्

च् छ् ज् झ् ञ्

ट् ठ् ड् ढ् ण्

त् थ् द् ध् न्

प् फ् ब् भ् म्

य् र् ल् व्

श् ष् स्

ह् ळ्

**विशेष संयुक्त व्यंजने**

क्ष् ज्ञ्

**अंक**

० १ २ ३ ४ ५ ६ ७ ८ ९

३. कोशामध्ये नोंदी करताना सुरुवातीला अंक व विरामचिन्हे द्यावीत आणि नंतर वरीलप्रमाणे स्वर, स्वरादी, व्यंजने व विशेष संयुक्त व्यंजने असा वर्णक्रम वापरावा.

४. परिशिष्ट चारमध्ये वर्णक्रम उदाहरणे घेऊन स्पष्ट दाखवला आहे. सर्वत्र एकरूपता व सुसूत्रता राखण्यासाठी सर्वांनी ह्यापुढील काळात कोश, सूची व तत्सम वाङ्मय तयार करताना ह्या वर्णक्रमाचे पालन करावे.

५. अलीकडच्या काही तक्त्यांमध्ये 'ङ्' आणि 'ञ्' ह्या अनुनासिकांचा समावेश नसतो. तथापि 'ङ्, ञ, ण्, न्, म्' ह्या पाचही अनुनासिकांचा वर्णचिन्हांच्या तक्त्यामध्ये समावेश असणे आवश्यक आहे.

६. तक्त्यामध्ये अंक देताना देवनागरीत लिहावेत. रोमन लिपीतील जागतिक अंक तक्त्यात देण्याची आवश्यकता नाही.

# परिशिष्ट दोन
# जोडाक्षरलेखन

ज्या अक्षरात दोन किंवा दोनपेक्षा अधिक व्यंजने एकापाठोपाठ येतात व शेवटी स्वर येतो ते अक्षर 'जोडाक्षर' होय.

उदा० — ग् + ण् + अ = ग्ण (रुग्ण)

ख् + ख् + आ = ख्खा (सख्खा)

ख् + र् + इ = ख्रि (ख्रिस्त)

थ् + र् + ई = थ्री

म् + ह् + ऐ = म्है (म्हैस)

ब् + ल् + ऑ = ब्लॉ (ब्लॉक)

मराठी भाषेमध्ये वैशिष्ट्यपूर्ण रीतीने जोडाक्षरलेखन केले जाते. दोन किंवा अधिक व्यंजनांचे जोडाक्षर पाहिल्यास ते एक अक्षर दिसेल अशा पद्धतीने जोडलेले असते. त्यामुळे जोडाक्षरलेखनातील पहिले महत्त्वाचे तत्त्व हे की, जोडाक्षराची जोडणी ही ते अक्षर पाहताच लक्षात आली पाहिजे आणि दुसरे तत्त्व हे की, उच्चारात ज्या क्रमाने व्यंजने असतील त्या क्रमाने जोडाक्षराचे लेखन व्हायला पाहिजे. पुढे जोडाक्षर-लेखनाच्या पद्धती दर्शवलेल्या आहेत. त्या पद्धतींनुसार जोडाक्षरलेखन करावे.

मराठी व्यंजनांचे त्यांच्या लेखनाकारानुसार म्हणजे लेखनात दंड (उभी रेषा) कुठे येतो त्यानुसार चार वर्ग होतात.

१. शेवटी दंड असणारी व्यंजने
२. मध्ये दंड असणारी व्यंजने
३. अर्धा दंड असणारी व्यंजने
४. दंड नसलेली व्यंजने

ही व्यंजने जोडाक्षरात प्रारंभी किंवा शेवटी आल्यानंतर जोडाक्षरलेखन कसे होते त्याची सविस्तर माहिती पुढे दिली आहे.

**१. शेवटी दंड म्हणजे उभी रेघ असलेली व्यंजने**

(अ) स्वतंत्र दंड असणारी व्यंजने : ग् ण् श्

(आ) जोडलेला दंड असणारी व्यंजने : ख् घ् च् ज्
झ् त् थ् ध्
न् प् ब्
भ् म् य् व्
ष् स्

ही व्यंजने जोडाक्षरात आधी आली की त्यातील दंड काढून जोडाक्षर तयार होते. उदा० —

| **व्यंजन** | **जोडाक्षरात येणारे रूप** | **उदाहरणे** |
|---|---|---|
| ख् | ख़ | सख्खा (ख् + खा), ख्यातनाम (ख् + या), ख्रिस्त (ख् + रि) |
| ग् | ग | रुग्ण (ग् + ण), दिग्दर्शन (ग् + द), दग्ध (ग् + ध) + भग्न (ग् + न) |
| घ् | घ | विघ्न (घ् + न), वाघ्या (घ् + या), घ्राण (घ् + रा) |
| च् | च | कच्चा (च् + चा), परिच्छेद (च् + छे), च्यावच्याव (च् + या) |
| ज् | ज | मज्जा (ज् + जा), ज्वर (ज् + व), ज्या (ज् + या) |
| झ् | झ | माझ्या (झ् + या), ओझ्याने (झ् + या) |
| ण् | ण | षण्मास (ण् + म), कण्व (ण् + व), अरण्य (ण् + य) |
| त् | त | उत्कट (त् + क), त्वरित (त् + व), वत्स (त् + स), उत्तर (त् + त) |
| | | आत्या (त् + या), त्रयी (त् + र), त्रिताल (त् + रि),<br>त् + र ह्यांचे जोडाक्षर 'त्र' असे होते. |
| थ् | थ | तथ्य (थ् + य), पथ्य (थ् + य),<br>थ्री (इंग्रजीतील 'तीन' ह्या अर्थाचा शब्द थ् + री) |
| ध् | ध | ध्यास (ध् + य), ध्रुव (ध् + रु) ध्वनी (ध् + व) |
| न् | न | अन्न (न् + न), जन्म (न् + म), अन्वय (न् + व) |
| प् | प | आप्त (प् + त), स्वप्न (प् + न), प्याला (प् + या), प्रखर (प् + र) |
| ब् | ब | अब्ज (ब् + ज), शब्द (ब् + द), लुब्ध (ब् + ध), ब्याद (ब् + या) |
| | | ब्रश (ब् + र), ब्लॉक (ब् + लॉ) |
| भ् | भ | अभ्यास (भ् + या), भ्याड (भ् + या), अभ्रा (भ् + रा) |
| म् | म | म्यान (म् + या), म्लान (म् + ला), म्हैस (म् + है) |
| य् | य | हिय्या (य् + या), भय्या (य् + या), शय्या (य् + या) |
| व् | व | व्यय (व् + य), अव्वल (व् + व) |
| ष् | ष | शुष्क (ष् + क), कृष्ण (ष् + ण), निष्पाप (ष् + पा), मनुष्य (ष् + य) |
| स् | स | स्तुती (स् + तु), स्थिर (स् + थि), स्मरण (स् + म), स्वर (स् + व) |
| श् | श | जोडाक्षरात 'श' आधी आल्यास त्याचे दोन प्रकारे लेखन होते. |

आधुनिक ‘श’ हे पूर्णाक्षर ‘श’ ह्या आकृतीने पूर्वी दाखवले जात असे. तथापि, अर्वाचीन काळात ‘श’ ही अक्षराकृती स्वतंत्रपणे नव्हे, तर फक्त जोडाक्षरांतच पूर्वपदी उपयोजिली जाते. त्यामुळे जोडाक्षरात ‘श’ आधी आल्यास दंड काढून टाकून किंवा वरील अक्षराकृती योजून जोडाक्षरे तयार केली जातात.

उदा॰ – (अ) अश्म (श + म), मश्गूल (श + गू), आवश्यक (श + य)

(आ) प्रश्न (श्‍ + न), पश्चिम (श्‍ + चि), श्री (श्‍ + ्री),

श्रुती (श्‍ + ्रु), विश्वास (श्‍ + वा), श्वान (श्‍ + वा)

श् + र चे जोडाक्षर नेहमी ‘श्र’ असेच करावे. ‘र’च्या जोडाक्षरामध्ये ह्याचे स्पष्टीकरण आहे.

**२. मध्यभागी दंड असणारी व्यंजने :–** क् फ्

मराठी वर्णचिन्हांमध्ये फक्त ‘क्’ आणि ‘फ्’ ही दोन व्यंजने मध्यभागी दंड असलेली आहेत. जोडाक्षरात ही व्यंजने आधी येतात तेव्हा ती ‘क’ आणि ‘फ’ अशी लिहावीत. उदाहरणार्थ, क् – रक्त (क + त) ह्या शब्दातील क + त चे जोडाक्षरलेखन विकल्पाने ‘क्त’ असे करण्यास हरकत नाही. चक्र (क + र) ह्या शब्दातील क + र जोडाक्षरलेखन विकल्पाने ‘क्र’ असे करण्यास हरकत नाही. क्लिष्ट (क + लि), पक्व (क + व)
फ् – चाफ्याचे (फ + या), कॉलिफ्लॉवर (फ + लॉ)

**३. अर्धा दंड असणारी व्यंजने :–** छ् ट् ठ् ड् ढ् द् ल् ह् ळ्

(अ) १) ‘ळ्’ हे व्यंजन जोडाक्षरात आधी आल्यास त्यातील दंड काढून टाकावा.

उदा॰ – ळ् – फळ्या, तळ्यात, वाळ्याचा (ळ + य)

२) ‘छ्’ हे व्यंजन जोडाक्षरात आधी आल्यास त्यातील दंड काढून टाकू नये.

उदा॰ – छ् – उच्छ्वास (उत् + श्वास = उच् + छ्वास = उच्छ्वास)

(आ) ‘ट् ठ् ड् ढ्’ आणि ‘ह्’ ही व्यंजने आधी आल्यास आणि त्यांच्यापुढे ‘य’ हे व्यंजन आल्यास त्याचे लेखन ‘्य’ असे करून जोडाक्षर लिहावे.

उदा॰ – ट् – कोट्यवधी, वाट्याला, पाट्यावर

ठ् – साठ्यात, ताठ्याने

ड् – पगड्या, साड्या

ढ् – वेढ्यामध्ये

ह् – वह्या, वाह्यात, कह्यात

(इ) 'द्' हे व्यंजन जोडाक्षरात आधी आल्यास आणि त्याच्यापुढे 'य' आल्यास 'द्य' असे लिहावे.

उदा० — उद्या, विद्या, उद्यान, द्योतक. 'द्य' चे लेखन ह्या अक्षराकृतीप्रमाणेच करावे. 'दय' किंवा 'द्‌य' असे करू नये.

जोडाक्षरात 'द्'च्या पुढे 'ग', 'घ', 'ध', किंवा 'व' असल्यास 'द'च्या खालील बाजूस ते अक्षर जोडावे.

उदा० — बुद्धी, शुद्धलेखन, प्रसिद्धी, पद्धत (द् + ध)

द्वंद्व, द्वितीय, द्विरुक्ती, द्वित्व, द्वीप, द्वापर, द्वेष, विद्वान (द् + व)

अपवाद : मात्र जेव्हा दोन विभिन्न पदांच्या संयोगातून 'द्' चे जोडाक्षर तयार होते तेव्हा, ते 'द'चा पाय मोडूनही लिहिण्याचा विकल्प आहे.

उदा० — उद् + गार = उद्गार/उद्‌गार

भगवद् + गीता = भगवद्गीता/भगवद्‌गीता

उद् + घाटन = उद्घाटन/उद्‌घाटन

(ई) जोडाक्षरामध्ये 'ल्' आधी आल्यास त्याचे लेखन 'ल' असे करावे.

उदा० — पाल्य, बाल्य, आल्हाद, उल्हास

**४. दंड नसलेली व्यंजने :— र्**

मराठी वर्णमालेत दंड नसलेले 'र्' हे एकच व्यंजन आहे. जोडाक्षरामध्ये 'र्' ह्या व्यंजनाचे त्याच्या स्थानानुसार विविध प्रकारे लेखन होते. जेव्हा ते जोडाक्षरामध्ये पूर्णाक्षर म्हणून शेवटी येते तेव्हा त्याचे ׀, ׀ आणि ‸ असे तीन प्रकारांनी लेखन होते.

(अ) आधुनिक 'र' हे पूर्णाक्षर पूर्वी '׀' ह्या अक्षराकृतीने दाखवले जात असे; तथापि आता ही अक्षराकृती स्वतंत्रपणे नव्हे, तर जेव्हा जोडाक्षरात दंडयुक्त व्यंजनांपुढे 'र' हे पूर्णाक्षर म्हणून येते तेव्हा योजली जाते. म्हणून स्वतंत्र दंड असलेली व्यंजने जोडाक्षरात 'र' पूर्वी आली असता त्यांचा दंड काढून त्यांना ही अक्षराकृती जोडून जोडाक्षर तयार करावे.

उदा० — ग्रस्त (ग + ׀), घ्राण (घ + ׀ा) वज्र (ज + ׀),

प्रमाण (प + ׀), ब्र (ब + ׀), भ्रम (भ + ׀), नम्र (म + ׀),

व्रण (व + ׀), स्रोत (स + ׀ो).

'त्' ह्या व्यंजनास हे अक्षर पुढीलप्रमाणे जोडावे. त् + ׀ = त + ׀ = त्र

उदा० — त्रस्त, कुत्रा, पुत्र, मात्रा इत्यादी.

(आ) 'क्' आणि 'फ्' ह्या मध्यभागी दंड असणाऱ्या व्यंजनांनंतर 'र' पूर्णाक्षर आल्यास मधल्या दंडाला '͵' हे चिन्ह जोडून जोडाक्षर तयार करावे.

उदा० – वक्र, क्रियापद, आक्रंदन, आक्रोश, क्रौंच (क् + र). ('क्र' हे जोडाक्षर 'क्र' अशा वैकल्पिक पद्धतीनेही येईल.)

फ्रेम, फ्रीज, फ्रॉक (फ् + र).

(इ) 'द्' ह्या अर्धा दंड असलेल्या व्यंजनांनंतर 'र' हे पूर्णाक्षर आल्यास 'द' च्या खालच्या दंडाला '͵' हे चिन्ह जोडून जोडाक्षर तयार करावे.

उदा० – द्रव, द्राक्ष, द्रुत, द्रोह

(ई) 'छ्, ट्, ठ्, ड्, ढ्' ह्या अर्धदंड असणाऱ्या व्यंजनांनंतर 'र' हे पूर्णाक्षर आल्यास त्यांच्याखाली ' ‸ ' हे चिन्ह जोडून जोडाक्षर तयार करावे.

उदा० – कृच्छ्र (च् + छ् + र)

ट्रंक, ट्राम, ट्रे, राष्ट्र, धृतराष्ट्र (ट् + र)

ड्रम, ड्रिल, टंड्रा (ड् + र)

(उ) **रफार व रकार ह्यांतील फरक :–** रफाराचे चिन्ह 'र्' व रकाराचे चिन्ह 'ऱ' ह्या दोन्ही चिन्हांचा वापर स्वर व व्यंजनांच्या मध्ये आलेल्या 'र्'चा उच्चार दाखवण्यासाठी होत असला तरी त्या दोन्ही चिन्हांचा अर्थ वेगळा आहे.

रफाराचे चिन्ह ज्या अक्षरावर दाखवले जाते, त्या अक्षराच्या आधी येणाऱ्या स्वराला जोडून 'र्'चा उच्चार होतो. उदाहरणार्थ, सूर् + य = सूर्य. ह्याउलट रकाराचे चिन्ह ज्या अक्षरासोबत लिहिले जाते, त्याच अक्षरातील व्यंजनाच्या सुरुवातीस जोडून 'र्'चा उच्चार होतो. उदाहरणार्थ, सु + र् या = सुऱ्या.

रफाराची इतर उदाहरणे :– धैर्य, पूर्व, आशीर्वाद, पर्वा, आचार्याने इत्यादी.

रकाराची इतर उदाहरणे :– पऱ्हा, बिऱ्हाड, कुऱ्हाड, आचाऱ्याने इत्यादी.

## ५. आडवी किंवा उभी जोडणी

जोडाक्षरामध्ये जेव्हा एकच व्यंजन दोनदा येते तेव्हा ह्या व्यंजनांची जोडणी उभ्या किंवा आडव्या पद्धतीने करतात. जोडाक्षरात एकच व्यंजन दोनदा आल्यास त्याला त्या व्यंजनाचे द्वित्त किंवा द्वित्व झाले असे म्हणतात.

**आडवी जोडणी :–** ह्या जोडणीमध्ये व्यंजने एकापुढे एक जोडून लिहिली जातात.

उदा० – सच्चा, उज्जयिनी, सत्ता, विषण्ण, गप्पा, मातब्बर, झिम्मा, हिय्या, रस्सा. 'द्' चे द्वित्त लिहिताना 'द्द' असे लिहावे. उदाहरणार्थ, 'मुद्दा', 'हुद्दा'.
ह्यांतील 'द्'ला 'या' जोडताना 'द्या' असे न लिहिता 'द्द्या' असे लिहिणे आवश्यक आहे.

**उभी जोडणी :–** ह्या जोडणीमध्ये व्यंजने एकाखाली एक जोडून लिहिली जातात. फक्त 'क्, ट्, ठ्, ड्, द्, ल्' ह्या व्यंजनांची जोडणी एकाखाली एक अशी करावी.

उदा॰ – पट्टा, बट्टा, पुठ्ठा, बुड्ढा, खड्डा, मुद्दा, (मार्क) ट्वेन, ट्विन.

**दोन्ही प्रकारची जोडणी :–** काही जोडाक्षरे दोन्ही प्रकारे लिहिली जातात.

उदा॰ – पक्व/पक्व, पक्का/पक्का, किल्ला/किल्ला, सल्ला/सल्ला, हल्ला/हल्ला, अन्न/अन्न, सुन्न/सुन्न, भिन्न/भिन्न इत्यादी.

**६.** 'स्र' हे जोडाक्षर स् + र चे आहे.

उदा॰ – स्रोत, स्राव.

'स्त्र' हे जोडाक्षर स् + त् + र चे आहे.

उदा॰ – शस्त्र, स्त्री.

## परिशिष्ट तीन

# विरामचिन्हे व इतर चिन्हे

बोलण्यातील विविध भाव व आशय लेखनामध्ये नेमकेपणाने व्यक्त करण्यासाठी जी विविध चिन्हे वापरली जातात ती विरामचिन्हे होत. विरामचिन्हे लिपीला पूरक असतात. सर्वसाधारणपणे लेखनामध्ये वापरली जाणारी विरामचिन्हे व इतर चिन्हे पुढीलप्रमाणे आहेत.

| अ० क्र० | चिन्हाचे नाव | चिन्हाचे दृश्यरूप | संबंधित चिन्हाच्या आधी व/वा नंतर जागा सोडण्याविषयीचा संकेत |
|---|---|---|---|
| १ | पूर्णविराम | . | नंतर जागा सोडावी. |
| २ | प्रश्नचिन्ह | ? | आधी (वैकल्पिक) व नंतर जागा सोडावी. |
| ३ | उद्गारचिन्ह | ! | आधी (वैकल्पिक) व नंतर जागा सोडावी. |
| ४ | स्वल्पविराम | , | नंतर जागा सोडावी. |
| ५ | अर्धविराम | ; | नंतर जागा सोडावी. |
| ६ | अपूर्णविराम किंवा द्विबिंदुचिन्ह | : | आधी व नंतर जागा सोडावी. |
| ७ | संयोगचिन्ह | - | आधी व नंतर जागा सोडू नये. |
| ८ | व्याप्तिचिन्ह | – | आधी (वैकल्पिक) व नंतर (वैकल्पिक) जागा सोडावी. |
| ९ | अपसारणचिन्ह किंवा वियोगचिन्ह | — | आधी व नंतर जागा सोडावी. |
| १० | लोपचिन्ह किंवा बिंदुमाला | … | आधी (वैकल्पिक) व नंतर जागा सोडावी. मात्र सुरुवातीच्या अवतरणचिन्हानंतर लगेच लोपचिन्ह योजताना अवतरणाच्या आत लोपचिन्हाआधी जागा सोडू नये, त्याच्या केवळ नंतर जागा सोडावी. |
| ११ | विकल्पचिन्ह किंवा अथवाचिन्ह | / | आधी (वैकल्पिक) व नंतर (वैकल्पिक) जागा सोडावी. |
| १२ | छेदचिन्ह | ⁄ | आधी व नंतर जागा सोडू नये. |
| १३ | तिर्यकरेषा | ⁄ | आधी व नंतर (वैकल्पिक) जागा सोडू नये. |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | दुहेरी अवतरणचिन्ह | “ (सुरू होणारे अवतरणचिन्ह)<br>” (बंद होणारे अवतरणचिन्ह) | सुरुवातीच्या अवतरणचिन्हाच्या आधी व बंद होणाऱ्या अवतरणचिन्हाच्या नंतर जागा सोडावी. |
| १५ | एकेरी अवतरणचिन्ह | ‘ (सुरू होणारे अवतरणचिन्ह)<br>’ (बंद होणारे अवतरणचिन्ह) | सुरुवातीच्या अवतरणचिन्हाच्या आधी व बंद होणाऱ्या अवतरणचिन्हाच्या नंतर जागा सोडावी. |
| १६ | अधोरेखा | ____<br>उदा॰ — (पाठ्य) | जागा सोडण्याचा विषय अप्रस्तुत आहे. |
| १७ | फुल्या | ××× | ‘फुल्या’ हे चिन्ह पूर्ण शब्दाच्या जागी येत असल्यास, शब्दाच्या आधी व नंतर जागा सोडतात तशी ती सोडावी. ते शब्दातील अंश म्हणून सुरुवातीला येत असल्यास त्याच्या आधी आणि शब्दातील अंश म्हणून शेवटी येत असल्यास त्याच्या नंतर जागा सोडावी. ते शब्दातील अंश म्हणून शब्दात मध्ये कुठेतरी येत असल्यास, त्याच्या आधी व नंतर जागा सोडू नये, शब्दामध्ये ते सलगपणे लिहावे. |
| १८ | काकपद | ⁁ | जागा सोडण्याचा विषय अप्रस्तुत आहे. |
| १९ | वरीलप्रमाणे-चिन्ह किंवा तंतोतंत-चिन्ह | —"— | आधी व नंतर जागा सोडावी. |
| २० | गोल कंस | ( ) | सुरुवातीच्या कंसाच्या आधी व बंद होणाऱ्या कंसाच्या नंतर जागा सोडावी. |
| २१ | चौकोनी किंवा चौकटी कंस | [ ] | सुरुवातीच्या कंसाच्या आधी व बंद होणाऱ्या कंसाच्या नंतर जागा सोडावी. |
| २२ | महिरपी कंस | { } | सुरुवातीच्या कंसाच्या आधी व बंद होणाऱ्या कंसाच्या नंतर जागा सोडावी. |
| २३ | संक्षेपचिन्ह | . किंवा ॰ | नंतर जागा सोडावी. |

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | एकेरी दंड | । | आधी व नंतर जागा सोडावी. |
| २५ | दुहेरी दंड | ॥ | आधी व नंतर जागा सोडावी. |

**टिपा**

१. सदृश वाटणाऱ्या पण भिन्न रूप व वापर असलेल्या चिन्हांचे लेखन किंवा टंकन करताना त्यांच्यातील फरक लक्षात घ्यावे.

- द्विबिंदुचिन्ह (:) (उदाहरणार्थ, पत्ता :) व विसर्ग (ः) (उदाहरणार्थ, अक्षरशः).
- संयोगचिन्ह (-) (उदाहरणार्थ, विद्यार्थी-मंडळ), व्याप्तिचिन्ह (–) (उदाहरणार्थ, १–१००), आडवा रकार (ऱ) (उदाहरणार्थ, 'साऱ्या'मधील 'ऱ्या').
- विकल्पचिन्ह (/) (उदाहरणार्थ, अंकी/अक्षरी लेखन), छेदचिन्ह (⁄) (उदाहरणार्थ, १⁄२) आणि तिर्यकरेषा (⁄) (उदाहरणार्थ, ०१⁄०१⁄२०२२)

२. प्रश्नचिन्हाच्या आणि उद्गारचिन्हाच्या आधी तसेच तिर्यकरेषेच्या नंतर जागा सोडण्याची आवश्यकता आहे की नाही, ह्याबाबत संगणकीय व्यवहारात टंकानुसार वेगवेगळी स्थिती दिसते.

३. पूर्णविरामादी चिन्हे एकेरी व दुहेरी अवतरण संपताना येत असतील, तर ती बंद होणाऱ्या अवतरणचिन्हाच्या आधी लिहावी व त्यानंतर तिथे अवतरणाच्या आत जागा सोडू नये. बंद होणाऱ्या अवतरणचिन्हानंतर नेहमीप्रमाणे जागा सोडावी.

# परिशिष्ट चार
# वर्णक्रम

१. वर्णक्रम स्वर, स्वरादी, व्यंजने आणि शेवटी ‘क्ष्’, ‘ज्ञ्’ ही विशेष संयुक्त व्यंजने असा ठेवावा.

२. कोश, सूची व तत्सदृश वाङ्मयासाठी आवश्यक त्या नोंदी अकारविल्हे करताना वरील वर्णक्रम वापरावा. कोशामध्ये अकारविल्हे रचना करताना अंक (० ते ९) आणि विरामचिन्हे (स्वल्पविराम, अर्धविराम इत्यादी) 'अ'पासून प्रारंभ होणाऱ्या स्वरांच्या आधी घ्यावीत. थोडक्यात प्रथम अंक द्यावेत; त्यानंतर विरामचिन्हे द्यावीत आणि त्यानंतर उपरोक्ताप्रमाणे वर्णक्रम ठेवावा.

‘क’ ह्या अक्षराने सुरू होणाऱ्या शब्दांच्या उदाहरणाने हा वर्णक्रम येथे स्पष्ट करून दाखवलेला आहे.

स्वर जोडल्यानंतर ‘क’ ह्या व्यंजनाक्षराचा मुख्य क्रम पुढीलप्रमाणे राहील.

क का कि की कु कू कृ कॄ के कॅ कै को कॉ कौ

क ह्या अक्षरानंतर क्रमाने स्वर असणारे शब्द.

उदा॰ — कअ... ते कऔ... पर्यंत.

उदा॰ — कइ, कई, कऊबऊ... पर्यंत.

त्यानंतर ‘कं’ने सुरू होणारे सर्व शब्द. ह्यामध्ये परत कंअ... पासून कंज्ञ... पर्यंत.

उदा॰ — कं, कंक, कंगाल, कंचन, कंजर, कंटाळा, कंठ, कंड, कंद, कंस... इत्यादी.

त्यानंतर ‘कः’ने सुरू होणारे सर्व शब्द. ह्यामध्ये परत कःअ... पासून कःज्ञ... पर्यंत.

उदा॰ — कःपदार्थ... इत्यादी.

त्यानंतर ‘क’ पुढे क्रमाने सर्व व्यंजने येणारे शब्द (कक... कका... ककौपर्यंत) अशा प्रकारे ‘क’ ते ‘ज्ञ’ पर्यंत प्रत्येक व्यंजन क्रमाने घेणे. ह्यानंतर का, कि, की... असे क्रमाने ‘कौ’पर्यंतचे शब्द वर नमूद केलेल्या वर्णक्रमाने घेणे.

‘कौ’पर्यंत सर्व शब्द झाल्यानंतर ‘क’ ची जोडाक्षरे घेणे.

जोडाक्षरामध्ये अक्षरे ज्या क्रमाने आलेली असतील ती लक्षात घेऊन वरील वर्णक्रमानुसार त्यांचा क्रम लावणे.

उदा॰ — क् + य = क्य/क्या... ने सुरू होणारे शब्द

क् + र = क्र/क्रा/क्रि... ने सुरू होणारे शब्द

क् + ल = क्ल/क्ला/क्लि... ने सुरू होणारे शब्द

क् + व = क्व/क्वि... ने सुरू होणारे शब्द

**संगणकावर वर्णक्रम पाहण्याची पद्धत**

३. अक्षर हे एक किंवा अधिक वर्णांचे बनले असल्यामुळे अक्षरांचा क्रम लावताना त्यांची वर्णरचना विचारात घेणे व त्यासाठी वर्णस्तंभाची मांडणी करणे अतिशय आवश्यक असते. मुद्रित मजकुरात (शब्दकोश इत्यादी) अक्षरांचे क्रम पाहावयास मिळतात. तथापि संगणकीय संदर्भात शब्दांच्या वर्णरचनेचे उभे स्तंभ तयार करून प्रत्येक स्तंभावारी वर्णक्रम पाहावा लागतो.

**उदाहरण पहिले – दोन शब्दांतील स्थानक्रमाचा विचार**

१. गोप = ग् + ओ + प् + अ

२. गोपी = ग् + ओ + प् + ई

पहिल्या व दुसऱ्या शब्दातील वर्णरचनेतील पहिले तीन वर्ण एकसारखे असल्याने चौथ्या स्तंभावर जाऊन जो वर्ण, वर्णक्रमात प्रथम असेल तो शब्द प्रथम यावयास हवा. ह्या उदाहरणात 'अ' हा वर्ण प्रथम येईल व 'ई' हा वर्ण नंतर येईल. त्यामुळे वर्णक्रमानुसार 'गोपी' हा शब्द 'गोप' ह्या शब्दानंतर येईल.

**उदाहरण दुसरे – तीन शब्दांतील स्थानक्रमाचा विचार**

१. कठोर = क् + अ + ठ् + ओ + र् + अ

२. कंठ = क् + अ + ं + ठ् + अ

३. काठ = क् + आ + ठ् + अ

ह्या शब्दांचा क्रम लावताना पहिल्या स्तंभातील वर्ण एकसारखे असल्यामुळे दुसऱ्या स्तंभातील वर्णाचा विचार करावा लागेल.

पहिल्या दोन शब्दांच्या वर्णरचनेत दुसऱ्या स्तंभात 'अ' हा वर्ण सारखा आहे व तिसऱ्या शब्दातील दुसऱ्या स्तंभात 'आ' हा वर्ण आहे. 'आ' हा वर्ण 'अ'च्या नंतर येत असल्यामुळे तो शब्द पहिल्या दोन शब्दांच्या नंतरच येणार हे निश्चित झाले. आता पहिल्या दोन शब्दांत कोणता क्रम येतो ते पाहू. त्यासाठी तिसऱ्या वर्णस्तंभाकडे पाहावे लागेल. वर्णक्रमामध्ये स्वरादिचिन्ह आधी घ्यावयाचे असल्यामुळे दुसऱ्या शब्दातील स्वरादिचिन्ह (अनुस्वार) हे 'ठ्' वर्णाच्या आधी येईल व दुसऱ्या शब्दाला (कंठ) पहिला स्थानक्रम द्यावा लागेल. त्यामुळे शब्दांचा स्थानक्रम पुढीलप्रमाणे राहील.

१. कंठ

२. कठोर

३. काठ

**उदाहरण तिसरे – जोडाक्षरयुक्त शब्दांतील स्थानक्रमाचा विचार**

१. क्रम = क् + र् + अ + म् + अ

२. किंचित = क् + इ + ं + च् + इ + त् + अ

३. क्वचित = क् + व् + अ + च् + इ + त् + अ

ह्या तिन्ही शब्दांच्या वर्णरचनेतील पहिल्या वर्णस्तंभात 'क्' हा वर्ण असल्याने दुसऱ्या स्तंभातच तिन्ही शब्दांचा स्थानक्रम अनुक्रमे 'किंचित', 'क्रम', 'क्वचित' असा निश्चित झाल्याने तिसऱ्या स्तंभात जाण्याची आवश्यकता नाही. पण समजा, दुसऱ्या स्तंभातही एकच वर्ण आला असता तर मात्र पुढच्या (तिसऱ्या) स्तंभाकडे जावे लागले असते.

**उदाहरण चौथे – समान जोडाक्षर असलेल्या तीन शब्दांतील स्थानक्रमाचा विचार**

१. भ्रमनिरास = भ् + र् + अ + म् + अ + न् + इ + र् + आ + स् + अ

२. भ्रमित = भ + र् + अ + म् + इ + त् + अ

३. भ्रमन्ती = भ् + र् + अ + म् + अ + न् + त् + ई

ह्या शब्दांमध्ये पहिले चार स्तंभ सारख्याच वर्णाचे असल्यामुळे पाचव्या स्तंभातील वर्ण विचारात घ्यावे लागतील. पाचव्या स्तंभातील 'इ' हा वर्ण 'अ' च्या नंतर येत असल्यामुळे 'भ्रमित' हा शब्द तिसऱ्या स्थानक्रमावर येणार हे निश्चित झाले. आता राहिलेल्या दोन शब्दांमध्ये पहिला–दुसरा क्रम लावण्यासाठी सहाव्या स्तंभाचा वर्णक्रम विचारात घ्यावा लागेल. सहाव्या स्तंभामध्ये 'न्' हा सारखाच वर्ण आहे. त्यामुळे सातव्या स्तंभातील वर्ण विचारात घ्यावा लागेल. 'इ' हा वर्ण 'त्' ह्या वर्णाच्या आधी येत असल्यामुळे 'भ्रमनिरास' हा शब्द आधी येईल आणि 'भ्रमन्ती' हा शब्द त्यानंतर येईल. त्यामुळे शब्दांचा स्थानक्रम पुढीलप्रमाणे राहील.

१. भ्रमनिरास

२. भ्रमन्ती

३. भ्रमित

तथापि, ह्या ठिकाणी एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की 'भ्रमन्ती' हा शब्द पर-सवर्णाचा वापर न करता अनुस्वार देऊन 'भ्रमंती' असा लिहिला तर ह्या शब्दांचा वर्णक्रम बदलेल.

१. भ्रमनिरास = भ् + र् + अ + म् + अ + न् + इ + र् + आ + स् + अ

२. भ्रमंती = भ् + र् + अ + म् + ं + त् + ई

वर्णक्रमामध्ये स्वरादिचिन्ह व्यंजनाच्या आधी येत असल्यामुळे वर्णक्रम पुढीलप्रमाणे राहील.

१. भ्रमंती

२. भ्रमनिरास

३. भ्रमित

## परिशिष्ट पाच

# देवनागरी अंक आणि त्यांचे प्रमाणीकृत अक्षरी लेखन

० शून्य
१ एक
२ दोन
३ तीन
४ चार
५ पाच
६ सहा
७ सात
८ आठ
९ नऊ
१० दहा
११ अकरा
१२ बारा
१३ तेरा
१४ चौदा
१५ पंधरा
१६ सोळा
१७ सतरा
१८ अठरा
१९ एकोणीस
२० वीस
२१ एकवीस
२२ बावीस
२३ तेवीस
२४ चोवीस
२५ पंचवीस
२६ सव्वीस
२७ सत्तावीस
२८ अठ्ठावीस
२९ एकोणतीस
३० तीस
३१ एकतीस
३२ बत्तीस
३३ तेहतीस
३४ चौतीस
३५ पस्तीस
३६ छत्तीस
३७ सदतीस
३८ अडतीस
३९ एकोणचाळीस
४० चाळीस
४१ एकेचाळीस
४२ बेचाळीस
४३ त्रेचाळीस
४४ चव्वेचाळीस
४५ पंचेचाळीस
४६ शेहेचाळीस
४७ सत्तेचाळीस
४८ अठ्ठेचाळीस
४९ एकोणपन्नास
५० पन्नास
५१ एकावन्न
५२ बावन्न
५३ त्रेपन्न
५४ चौपन्न
५५ पंचावन्न
५६ छप्पन्न
५७ सत्तावन्न
५८ अठ्ठावन्न
५९ एकोणसाठ
६० साठ
६१ एकसष्ट
६२ बासष्ट
६३ त्रेसष्ट
६४ चौसष्ट
६५ पासष्ट
६६ सहासष्ट
६७ सदुसष्ट
६८ अडुसष्ट
६९ एकोणसत्तर
७० सत्तर
७१ एकाहत्तर
७२ बाहत्तर
७३ त्र्याहत्तर
७४ चौऱ्याहत्तर
७५ पंचाहत्तर
७६ शाहत्तर
७७ सत्त्याहत्तर
७८ अठ्ठ्याहत्तर
७९ एकोणऐंशी
८० ऐंशी
८१ एक्याऐंशी
८२ ब्याऐंशी
८३ त्र्याऐंशी
८४ चौऱ्याऐंशी
८५ पंच्याऐंशी
८६ शाऐंशी
८७ सत्त्याऐंशी
८८ अठ्ठ्याऐंशी
८९ एकोणनव्वद
९० नव्वद
९१ एक्याण्णव
९२ ब्याण्णव
९३ त्र्याण्णव
९४ चौऱ्याण्णव
९५ पंचाण्णव
९६ शहाण्णव
९७ सत्त्याण्णव
९८ अठ्ठ्याण्णव
९९ नव्याण्णव
१०० शंभर
१००० हजार
१०,००० दहा हजार
१,००,००० लाख
१०,००,००० दहा लाख
१,००,००,००० कोटी
१०,००,००,००० दहा कोटी
१,००,००,००,००० अब्ज

## परिशिष्ट सहा

# मराठी वर्णमाला-तक्ता
## सर्वसाधारण वापरासाठी

### स्वर

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ | आ | इ | ई | उ |
| ऊ | ऋ | ऌ | ए | ॲ |
| ऐ | ओ | ऑ | औ | |

### स्वरादी

ं (अनुस्वार) ः (विसर्ग)

### व्यंजने

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क् | ख् | ग् | घ् | ङ् |
| च् | छ् | ज् | झ् | ञ् |
| ट् | ठ् | ड् | ढ् | ण् |
| त् | थ् | द् | ध् | न् |
| प् | फ् | ब् | भ् | म् |
| य् | र् | ल् | व् | |
| श् | ष् | स् | | |
| ह् | ळ् | | | |

### विशेष संयुक्त व्यंजने

क्ष् ज्ञ्

### अंक

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ० | १ | २ | ३ | ४ |
| ५ | ६ | ७ | ८ | ९ |

## परिशिष्ट सात

# मराठी अक्षरमाला-तक्ता

## शालेय स्तरासाठी

### स्वरचिन्हे व स्वरांशचिन्हे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ | आ (ा) | इ (ि) | ई (ी) | उ (ु) |
| ऊ (ू) | ऋ (ृ) | ऌ (ॢ) | ए (े) | ॲ (ॅ) |
| ऐ (ै) | ओ (ो) | ऑ (ॉ) | औ (ौ) | |

### स्वरादी

ं (अनुस्वार) ः (विसर्ग)

### व्यंजने

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क | ख | ग | घ | ङ |
| च | छ | ज | झ | ञ |
| ट | ठ | ड | ढ | ण |
| त | थ | द | ध | न |
| प | फ | ब | भ | म |
| य | र | ल | व | |
| श | ष | स | | |
| ह | ळ | | | |

### विशेष संयुक्त व्यंजने/विशेष जोडाक्षरे

क्ष ज्ञ

### अंक

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ० | १ | २ | ३ | ४ |
| ५ | ६ | ७ | ८ | ९ |